महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (मुख्य) परीक्षा

**A**

२८-४-१२

**2011**

CODE :

प्रश्नपुस्तिका क्रमांक

BOOKLET NO.

# प्रश्नपुस्तिका

## मराठी, इंग्रजी व सामान्य अध्ययन

वेळ : $1\frac{1}{2}$ (दीड) तास

एकूण प्रश्न : 150

एकूण गुण : 150

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी, **ह्याकरिता फक्त काळ्या शाइचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे, त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

StudentBounty.com

www.StudentBounty.com

StudentBounty.com

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.StudentBounty.com

StudentBounty.com

1. 'अनल' या शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा.
   (1) विस्तव (2) नवल (3) गगन (4) जंगल

---

2. अपमान केल्यास कुणाला राग येत नाही ? वाक्याचा प्रकार सांगा.
   (1) होकारार्थी (2) नकारार्थी (3) उद्‌गारार्थी (4) विधानार्थी

---

3. 'तीळतीळ', 'हालहाल', 'हळूहळू' – शब्दप्रकार ओळखा –
   (1) अंशाभ्यस्त (2) अनुकरणवाचक (3) पूर्णाभ्यस्त (4) यापैकी नाही

---

4. वाक्य प्रकार ओळखा
   विधान – जेव्हा मोठी घंटा होते, तेव्हा शाळा सुटते.
   (1) केवलवाक्य (2) मिश्रवाक्य (3) संयुक्त वाक्य (4) यापैकी नाही.

---

5. नामाचे क्रियापदात रुपांतर करुन वाक्याचा अर्थ न बदलता विधान तयार करा.
   'उन्हामुळे त्याच्या चेहऱ्यावर घाम आला'.
   (1) उन्हामुळे त्याचा चेहरा पाणी-पाणी झाला. (2) उन्हामुळे त्याचा चेहरा घामेजला.
   (3) उन्हामुळे त्याचा चेहरा वाफाळला. (4) उन्हामुळे त्याचा चेहरा कोमेजला.

---

6. 'तू आला नसतास तरी चालले असते' -- अर्थाचा प्रकार ओळखा.
   (1) विध्यर्थ (2) आज्ञार्थ (3) स्वार्थ (4) संकेतार्थ

---

7. कर्तृकर्मसंकर प्रयोगाचे उदाहरण ओळखा –
   (1) तू मला ग्रंथ दिलास. (2) तुम्ही मला ग्रंथ दिला.
   (3) तुम्ही मला ग्रंथ दिला आहे. (4) तू मला ग्रंथ देणार आहेस.

---

8. 'कोल्हापुरी चिवडा', 'नागपुरी संत्री', 'पंढरीचा महिमा' ही __________ विशेषणे आहेत.
   (1) धातुसाधित (2) नामसाधित (3) सार्वनामिक (4) अव्ययसाधित

---

9. 'पावसासोबत गारा पडतील' – या विधानातील काळ ओळखा.
   (1) रीति भविष्यकाळ (2) अपूर्ण भविष्यकाळ
   (3) पूर्ण भविष्यकाळ (4) संभवसूचक भविष्यकाळ

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**P.T.O.**

www.StudentBounty.com

StudentBounty.com



**10.** '<u>घरावरुन</u> हत्ती गेला' - या वाक्यातील अधोरेखित शब्दाचा ध्वन्यर्थ ओळखा -

(1) घराच्या कौलावरुन (2) घरासमोरुन
(3) घराच्या मागच्या बाजूने (4) घराच्या वरच्या बाजूने

---

**11.** 'खोदाई' या प्रत्ययसाधित शब्दास कोणता प्रत्यय लागला आहे ?

(1) ई (2) आई (3) आइ (4) अई

---

**12.** 'अतिशय', 'अतिक्रम', 'अतिरेक', - शब्दसिद्धी प्रकार ओळखा -

(1) प्रत्ययघटित (2) उपसर्गघटित (3) शब्दसाधिते (4) तद्धिते

---

**13.** 'गंगायाम् घोष:' - या वाक्यातील ध्वन्यर्थ ओळखा.

(1) गंगेच्या तटावरील वाडा (2) गंगेच्या पाण्यातील वाडा
(3) गंगेचा वाडा (4) गंगेच्या पवित्र वातावरणाने युक्त असा वाडा

---

**14.** 'शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावे' - प्रयोग ओळखा -

(1) कर्तरी (2) कर्मणी (3) भावे (4) संकर

---

**15.** आजन्म, आमरण, यथाशक्ती हे शब्द __________ समासाचे आहेत.

(1) अव्ययीभाव (2) तत्पुरुष (3) द्वंद्व (4) बहुव्रीही

---

**16.** 'सुंबाल्या करणे' या वाक्प्रचाराला समानार्थी वाक्प्रचार ओळखा.

(1) गाशा गुंडाळणे (2) पोबारा करणे (3) चोरावर मोर होणे (4) जीवाचे रान करणे

---

**17.** मराठीची पारंपारिक वर्णमाला एकूण __________ वर्णांची आहे.

(1) 52 (2) 50 (3) 48 (4) 47

---

**18.** '<u>येई येई</u> विठाबाई । माझें पंढरीचे आई'

वरील वाक्यातील अधोरेखित शब्दामधून साधित शब्दाचा कोणता प्रकार व्यक्त होतो ?

(1) सामासिक (2) अनुकरणवाचक (3) पूर्णाभ्यस्त (4) अंशाभ्यस्त

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

19. योग्य शब्दयोगी अव्ययाचा वाक्यात उपयोग करा.

डोळ्यांनी __________ पाहून देव दिसत नाही, अंत:चक्षूनी पहावा लागतो.

(1) सुद्धा (2) फक्त (3) केवळ (4) पण

---

20. 'हेला' या शब्दाचे स्त्रीलिंगी रुप लिहा.

(1) गाय (2) शेळी (3) म्हैस (4) कुत्री

---

21. हात फिरे तिथे लक्ष्मी फिरे आणि __________ .

(1) नशीब फिरे तिथे दु:ख उरे (2) नियती फिरे तिथे मृत्यू उरे

(3) बुद्धि फिरे तिथे सरस्वती नुरे (4) तोंड फिरे तिथे अवदसा फिरे

---

22. 'पुढारी' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिहा.

(1) नेता (2) प्रमुख (3) गुलाम (4) अनुयायी

---

23. कोणत्याही वाक्यात अथवा काव्यात एका किंवा अधिक वर्णाची पुनरूक्ती होते तेव्हा __________ अलंकार होतो.

(1) यमक (2) अनुप्रास (3) श्लेष (4) अपन्हुती

---

24. 'भाकरी, अक्का, अण्णा, अडकित्ता,' हे शब्द कोणत्या भाषेतून मराठीत रूढ झाले आहेत ?

(1) गुजराती (2) कानडी (3) पोर्तुगीज (4) फारसी

---

25. 'अं' आणि 'अ:' यांना काय म्हणतात ?

(1) स्वरादी (2) अनुस्वार (3) स्वर (4) मूलवर्ण

---

26. खालीलपैकी कोणत्या नामाचे अनेकवचन होत नाही ?

(1) चिपळी (2) खडावा (3) ज्वारी (4) प्रधानमंत्री

---

27. 'दुआब' या एका शब्दाशी संबंधित शब्दसमूह ओळखा–

(1) दोन व्यक्तींमधील रूबाब (2) दोन नद्यांमधील जागा

(3) दोन व्यक्तींमधील हेवेदावे (4) दोन घटकांमधील आदानप्रदान

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

28. 'अनेक वेदग्रंथांमध्ये' या शब्दसमूहासाठी योग्य पर्याय निवडा.

(1) वेदांत (2) वेदान्त (3) वेदामध्ये (4) वेदांमध्ये

---

29. 'कल्याणेश्वर' या शब्दाचा विग्रह ओळखा.

(1) कल्याण करणारा तो कल्याणेश्वर (2) कल्याण करणारा ईश्वर तो कल्याणेश्वर

(3) कल्याणकर्ता तो कल्याणेश्वर (4) कल्याणाची अपेक्षा बाळगणारा तो कल्याणेश्वर

---

30. 'अलीकडे मी तुम्हाला एकही पत्र लिहिले नाही' - या विधानातील विधेयविस्तार ओळखा.

(1) मी (2) तुम्हाला एकही पत्र (3) अलीकडे (4) लिहिले नाही

---

31. 'लोभाजीरावाने जास्त जमीन प्राप्त करण्यासाठी खूप धावाधाव केली पण अती लोभाने त्याचा मृत्यू झाला', म्हणतात ना ________ .

(1) आयत्या बिळावर नागोबा (2) अती शहाणा त्याचा बैल रिकामा

(3) अती तिथे माती (4) एक ना धड भाराभार चिंध्या

---

32. 'जेव्हा घाम गाळला जातो तेव्हाच खायला भाकरी मिळते' - या क्रियाविशेषण वाक्याचा उपप्रकार ओळखा.

(1) स्थलदर्शक (2) संकेतदर्शक (3) कारणदर्शक (4) कालदर्शक

---

33. 'तू लवकर घरी आलास म्हणजे आपण बागेत जाऊ'.

अधोरेखित शब्दाचा उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.

(1) संकेतबोधक (2) विकल्पबोधक (3) स्वरुपबोधक (4) कारणबोधक

---

34. 'चिल्लीपिल्ली' हा शब्द कोणत्या भाषेतील आहे?

(1) तामिळी (2) कानडी (3) तेलगू (4) गुजराती

---

35. 'श', 'ष', 'स' ही कोणत्या प्रकारची व्यंजने आहेत?

(1) अंतस्थ व्यंजने (2) उष्म व्यंजने (3) मूर्धन्य व्यंजने (4) तालव्य व्यंजने

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.StudentBounty.com

StudentBounty.com



36. 'द्रौपदीची थाळी' या वाक्प्रचाराचा अर्थ सांगा

(1) नेहमी गरज भागविणारी व्यक्ती
(2) कायम देणारी गोष्ट
(3) अत्यंत गरीबी
(4) खावयास जसे मिळेल तसे

---

37. स्पष्टीकरण द्यावयाचे झाल्यास पुढील चिन्ह वापरतात.

(1) अवतरण
(2) संयोग
(3) अपसरण
(4) स्वल्पविराम

---

38. 'तो कोठेही न थांबता बोलला' - होकारार्थी विधान बनवा.

(1) तो सलग बोलला.
(2) तो अस्खलित बोलला.
(3) तो सहजपणे बोलला.
(4) तो स्पष्ट बोलला.

---

39. 'खारुताई मला बघून झटकन् पळाली'.

अधोरेखीत शब्दातील क्रियाविशेषण अव्ययाचा प्रकार ओळखा.

(1) प्रकारदर्शक
(2) अनुकरणदर्शक
(3) निश्चयार्थक
(4) परिमाणवाचक

---

40. 'फासा पडेल तो डाव राजा बोलेल तो न्याय' – या अर्थाच्या म्हणीच्या विरुद्धार्थी म्हण ओळखा -

(1) पळणाऱ्यास एक वाट आणि शोधणाऱ्यास बारा वाटा
(2) ऐकावे जनाचे करावे मनाचे
(3) पिंडी ते ब्रम्हांडी
(4) बडा घर पोकळ वासा

---

41. 'घना आणि राधाचा शुभविवाह झाल्यावर त्यांच्या कुंटुबियांना एकदाचे ________ .

(1) न भूतो न भविष्यति वाटले
(2) हायसे वाटले
(3) सद्गदित झाल्यासारखे वाटले
(4) सव्यापसव्य झाल्यासारखे वाटले

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**P.T.O.**

www.StudentBounty.com

StudentBounty.com



42. 'घेता दिवाळी, देता शिमगा' या म्हणीचा अर्थ कोणता ?

(1) घरात खायची मारामार

(2) कमाई थोडी कष्ट भरपूर

(3) घ्यायला आनंद वाटतो, द्यायचे वेळी मात्र बोंबाबोंब

(4) उतावळेपणा करणे

43. वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या क्रियावाचक विकारी शब्दाला __________ म्हणतात.

(1) क्रियाविशेषण (2) क्रियापद (3) धातू (4) प्रत्यय

44. 'मन:पटल' या शब्दाची संधी सोडवा.

(1) मन: + पटल (2) मनस् + पटल (3) मानस + पटल (4) मनस + पटल

45. 'वर्ण' म्हणजे __________ होत.

(1) अक्षरे (2) शब्दरुपे (3) ध्वनिरुपे (4) वाक्यरुपे

**खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्न क्रमांक 46 ते 50 ची उत्तरे द्या.**

आगरकर हे महाराष्ट्रातील एक सच्चे बुद्धिवादी समाजसुधारक म्हणून प्रसिद्ध आहेत. जुन्या नव्या परंपरापूजकांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी सामाजिक सुधारणेचा सतत आग्रह धरला हे खरे आहे. पण त्यांच्या सुधारणावादाचा आशय साकल्याने व सम्यक्‌दृष्टीने तपासून पाहिला तर त्याचे मूळ त्यांच्या प्रखर राष्ट्रनिष्ठेतच आहे असे दिसून येईल. एम्.ए.चा अभ्यास चालू असतानाच टिळकांचा आणि त्यांचा स्नेह जडला; आणि त्या दोघांनी तेव्हाच "राजसेवेचा सामान्य मार्ग सोडून देऊन आपापल्या मनास प्रशस्त वाटेल त्या रीतीने आपल्या हयातीत आपल्या हातून होईल तेवढे देशकार्य करण्याचा निश्चय केला" होता. हिंदुस्थानातील एकंदर परिस्थितीचा त्यांनी अभ्यास केला आणि सध्याच्या स्थितीत ज्ञानप्रसार आणि विचारपरिवर्तन यांखेरीज दुसरा तरणोपाय नाही अशी त्यांची खात्री पटली. म्हणून विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, प्राचार्य आपटे, प्रो. केळकर यांच्यासमवेत त्यांनी शिक्षणसंस्था आणि वृत्तपत्रे यांच्याद्वारे लोकशिक्षणाचे कार्य हाती घेतले. आपल्या वृत्तपत्रीय लेखांतून त्यांनी विविध विषयांचा जो परामर्श घेतला, त्याचा उद्देश निव्वळ जिज्ञासापूर्ती किंवा ज्ञानानंद असा नसून देशहित, देशोन्नती हाच होता. 'केसरी'च्या ध्येयधोरणांबद्दल दुमत होण्याचे कारण नाही. 'सुधारक' या नावामुळे मात्र समजुतीचा घोटाळा होण्याचा संभव आहे. पण 'सुधारक काढण्याचा हेतु' या लेखात खुद्द आगरकरांनीच आपले मनोगत व्यक्त केले आहे. नैसर्गिक संपत्तीची

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.StudentBounty.com

StudentBounty.com

अनुकूलता असूनही हिंदुस्थानचा ऐतिहासिक चित्रपट किती निराशाजनक आहे ते या लेखात त्यांनी दाखवून दि आहे. वृक्षाचे रूपक योजून आपल्या वैयक्तिक आणि सामूहिक जीवनाच्या शिलावस्थेचे व नि:सत्वपणाचे त्यांनी चित्र रेखाटले आहे. आपल्या देशाची प्रगती खुंटवणाऱ्या कारणमालिकेत त्यांनी फक्त सामाजिकच नव्हे; तर राजकीय बाबींचाही निर्देश केलेला आहे. हे भरतखंडरूपी जरठ झाड कसे तरी अजून उभे आहे! पण त्यात काही त्राण उरलेले नाही. शेकडो वर्षाच्या स्थितिशीलतेमुळे ते आतून अगदी शुष्क होत आले आहे; आणि त्याचे खोड व फांद्या डळमळू लागल्या आहेत. त्याचे जीर्णत्व नाहीसे होऊन त्याला नवीनावस्था यावी, त्याची पूर्ण वाढ होऊन जगाला त्याच्या भव्यतेचा पुन्हा साक्षात्कार घडावा अशी अपेक्षा असेल, तर त्याची खूपखच्ची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचे भरपूर पाणी दिले पाहिजे. या कल्पनांचा उगम जरी युरोपातील देशांत झालेला असला, तरी तेथे आज जी सुधारणा दृष्टीस पडत आहे ती मागील अनेक सुधारणांचे सार आहे.

---

46. आगरकरांच्या वृत्तपत्रीय लिखाणाचा हेतु _________ हा होता.
    (1) देशहित, देशोन्नती (2) सामाजिक सुधारणा (3) जनजागृती (4) ज्ञानप्रसार

47. आगरकरांच्या वृत्तपत्राचे नाव ___________ होते.
    (1) सुधाकर (2) सुधारक (3) केसरी (4) नवसुधारक

48. आगरकरांना हिंदुस्थानच्या अभ्यासातून काय जाणवले ?
    (1) ज्ञानप्रसार आणि विचारपरिवर्तनाशिवाय दुसरा मार्ग नाही.
    (2) शिक्षणसंस्थांशिवाय दुसरा मार्ग नाही.
    (3) लोकशिक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही.
    (4) देशसेवा केल्याशिवाय दुसरा मार्ग नाही.

49. हिंदुस्थानच्या स्थितीशीलतेसाठी आगरकरांनी कोणते रूपक वापरले आहे ?
    (1) चित्राचे (2) खोड व फांदीचे (3) वृक्षाचे (4) निसर्गाचे

50. आगरकरांच्या सुधारणावादाचा पाया त्यांच्या ___________ .
    (1) बुद्धिवादात आहे. (2) सामाजिक सुधारणेत आहे.
    (3) परंपरा पूजकांच्या विरोधात आहे. (4) प्रखर राष्ट्रनिष्ठेतच आहे.

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**51.** Choose the **correct** alternative of Reported speech.

Rahul said, 'I go home every day'.

(1) Rahul pleaded he goes home every day.

(2) Rahul exclaimed he would go home every day.

(3) Rahul shouted he has to go home every day.

(4) Rahul said that he went home every day.

---

**52.** Choose the **correct** sentence from the alternatives given :

(1) I prefer tea than coffee
(2) I prefer tea rather than coffee
(3) I prefer tea to coffee
(4) I prefer to take tea than coffee

---

**53.** Rewrite the following using the **correct** alternative ________ to watch football everyday ?

(1) Do people in your country like
(2) People in your country like
(3) Had people in your country like
(4) Have people in your country like

---

**54.** Choose the **correct** meaning of the given phrase.

He is a bloody crook.

(1) He is stupid
(2) He is clever
(3) He knows nothing
(4) He is a cheat

---

**55.** Fill in the blank using appropriate alternative.

Candidates are not allowed to ________ for votes on the day of election.

(1) canvass (2) canvas (3) canavass (4) canavas

---

**56.** Choose the **correct** interrogative sentence from the following alternatives :

There is nothing better than a busy life.

(1) Why there is nothing better than a busy life ?

(2) Why there is something better than a busy life ?

(3) Is there anything better than a busy life ?

(4) Is there something better than a busy life ?

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

57. Choose the **correct** word, opposite in meaning for the word given below :

Rigid

(1) stiff (2) unbending (3) unyielding (4) flexible

58. Choose the **correct** spelt word from the following :

(1) Acsaptance (2) Acseptance (3) Acceptance (4) Acceptence

59. Fill in the blank with the appropriate word :

He was found stealing ________ he was fined.

(1) still (2) therefore (3) yet (4) however

60. Choose the **correct** alternative for the following word :

Monastery

(1) The place for luggage at a railway station.
(2) The place for monks.
(3) The place where artists work.
(4) The place where young plants are grown.

61. Choose the **correct** meaning from the given alternatives.

Mrs. Patil spoke in a plaintive voice.

(1) She spoke in a plain voice
(2) She spoke in a soft voice
(3) She spoke without any result
(4) She spoke in a sad and mournful voice

62. Choose the **correct** passive form of the sentence :

They were singing folk songs.

(1) They sang folk songs.
(2) Folk songs were being sung by them.
(3) Folk songs was sung by them.
(4) Folk song were sung by them.

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**P.T.O.**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**63.** Choose the nearest meaning of the underlined word.

There was nothing novel about the author's latest novel. The characters were old and the plot was borrowed.

(1) new word (2) in name only (3) new (4) harmful

---

**64.** Choose the **correct** sentence without an error in the use of Noun :

(1) He gave us much good advice (2) He gave us many good advices

(3) He gave us much good advise (4) He gave us many good advises

---

**65.** Choose the **correct** alternative for the phrase :

to distinguish oneself.

(1) to make oneself prominent (2) to gain ground

(3) to put up a good face (4) to do one a good turn

---

**66.** Choose from the following alternatives, the word which is closest in meaning with :

Accolade

(1) affection (2) approval (3) award (4) applause

---

**67.** Choose the **correct** word for the following sentence :

One who can speak two languages.

(1) Biennial (2) Bilingual (3) Centennial (4) Linguist

---

**68.** Fill in the blank with the suitable article

She has ________ new television set.

(1) the (2) an (3) a (4) none of the above

---

**69.** Choose the **correct** reported speech of the following sentence :

He said, "I can write a book on grammar."

(1) He said that he can write a book on grammar.

(2) He said that he wrote a book on grammar.

(3) He said that he will be writing a book on grammar.

(4) He said that he could write a book on grammar.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

70. Choose the **correct** alternative for the underlined part of the sentence.

She was more beautiful than <u>either of her three sisters.</u>

(1) each of her three sisters (2) any of her three sisters

(3) all of her three sisters (4) No improvement

---

71. Choose the **correct** synonym of :

Disgrace

(1) graceful (2) depress (3) dishonour (4) disappoint

---

72. Choose the **correct** sentence from the following :

(1) Many Indians are working in Dubai, isn't it ?

(2) Many Indians work in Dubai, don't they ?

(3) Many Indians work in Dubai, isn't it ?

(4) Many Indians work in Dubai, aren't they ?

---

73. Choose the **correct** alternative.

Because her alarm clock was broken she was late for class.

(1) Because her alarm clock was broken, she was late for class.

(2) She was late for class, because her alarm clock was broken.

(3) As, her alarm clock was broken, she was late for class.

(4) Because, she was late for class, her alarm clock was broken.

---

74. Choose the **correct** alternative for the following idiom :

He has accomplished a **<u>herculean task</u>**.

(1) impossible task (2) brave work

(3) incomplete work (4) work with great effort

---

75. Choose the **correct** alternative.

Whenever Suresh gets into trouble he makes a story to get out of it.

(1) makes for (2) makes out (3) makes up (4) no improvement

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

76. Choose the **correct** indirect form from the given alternatives :
He said to her, "Please wait here till I return".
(1) He said to her to wait till she returns.
(2) He requested her to wait there till he returned.
(3) He told her to wait there until he returns.
(4) He said to her please wait till she returns.

---

77. Choose the **correct** preposition to fill in the blank :
These three men quarrelled ________ themselves.
(1) by (2) among (3) within (4) between

---

78. Choose the **correct** meaning of given underlined words.
The baby has just <u>brought up</u> his milk again.
(1) provide a home (2) education for child
(3) vomit food (4) face or confront

---

79. Give the **correct** nearest meaning of the underlined word.
Please do not <u>defer</u> this work till tomorrow.
(1) postpone (2) disagree (3) regard (4) refuse

---

80. Fill in the blank with the **correct** word from the alternatives given below.
Incapable of being heard ________.
(1) inhearable (2) invisible (3) inaudible (4) inexplicable

---

81. Fill in the blank with the correct tense form of the verb given.
In the past, the brave Rajput women ________ death to dishonour.
(1) preferred (2) will prefer (3) has preferred (4) is preferring

---

82. Fill in the blank with the appropriate alternative.
Mushtaque got the letter registered after ________ it.
(1) ceiling (2) sealing (3) seling (4) silling

---

83. Choose from the following alternatives, the word which is opposite in meaning of the :
Archaic
(1) broken (2) old (3) dilapidated (4) modern

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

84. Fill in the blank using the **correct** pronoun.

I told my father all ________ had been said in the class.

(1) who (2) whom (3) whose (4) that

85. Choose the **correct** simple sentence from the alternatives :

He is a man who keeps his word.

(1) He is a man kept his word.
(2) He is a man of his word.
(3) He is a man keeping his word.
(4) He is a man to keep his word.

86. Which of the given alternatives can be used as a Noun Clause with the following :

The law will punish ________

(1) whichever is guilty
(2) whosoever is guilty
(3) that so ever is guilty
(4) him guilty

87. Choose the **correct** alternative to fill in the blank :

I am ________ pleased to see you.

(1) too (2) very (3) much (4) to

88. Replace the underlined words with the correct alternative.

<u>When I shall come to Delhi next</u>, I shall stay at the Ashoka Hotel.

(1) When I shall come to Delhi next,
(2) Next time when I come to Delhi,
(3) When I will come to Delhi next,
(4) When I come to Delhi next,

89. The underlined part of the sentence may have an error. Correct it with the one of the following alternative answers.

The proposals <u>strikes root</u> of community life.

(1) strike its root
(2) struck at the roots
(3) struck root
(4) No improvement

90. Fill in the blank with the **correct** idiomatic phrase from the given alternatives.

The two sisters are ________ in their behaviour.

(1) feast and famine
(2) nuts and bolts
(3) doom and gloom
(4) apples and oranges

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

91. Give **correct** word for "a specialist in diseases and defects of the eye".

(1) Ostler (2) Oculist (3) Optician (4) Optics

92. Choose the **correct** spelt word from the following :

(1) Garantee (2) Guarantee (3) Guaranti (4) Garanty

93. Choose the **correct** alternative to fill in the blank :

I have _________ one - rupee - note.

(1) a (2) the (3) an (4) any

94. Fill in the blank by choosing right alternative.

There is an obvious _________ in the law covering pension funds.

(1) hold (2) whole (3) loophole (4) holly

95. Choose the **correct** alternative and fill in the blank.

Vivek feels _________ at his first job in the remote rural area.

(1) Like a fish (2) Like a lamb

(3) Like a king (4) Like a fish out of water

**Read the following passage and choose the correct answer to each of the questions given below (Q. No. 96 to 100).**

Some years ago, I had the privilege of meeting the world's oldest man. At least, he said he was. And he was so dogmatic about it that the promoters of a cartoon strip that specialised in unbelievable oddities brought the old man to New York from his native Columbia to have him examined by a team of doctors at the Cornell Medical Centre. He was an Indian, he was four feet four inches tall ; he had an alligator - hide complexion and a tendency to swing to his right, whenever he passed from one medico to another. He said he was 167, born the same year as the American Constitution. When the name of George Washington was suggested to him to help him fix his generation, he said he remembered the man well. But he resented coming all the way to New York. He wanted to be left alone to go about his business, which at that time was the business of looking for a sixth wife to comfort him in his approaching old age.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.StudentBounty.com

StudentBounty.com

96. The old man did not like being brought to New York because :

(1) at that time he was busy looking for a sixth wife

(2) he did not like travelling much

(3) he didn't like New York

(4) he preferred to be left alone in his village

---

97. The old man claimed that the Americans gave themselves a Constitution :

(1) before he was born

(2) in the year of George Washington's birth

(3) two centuries ago

(4) one hundred and sixty seven years ago

---

98. The cartoon - strip creators got interested in him because :

(1) he was a comical nature.

(2) they wanted to feature him in a cartoon - strip.

(3) a person surviving at that age was odd and unbelievable.

(4) he had the tendency of swinging to his right.

---

99. The old man was 'dogmatic' about the fact that :

(1) he was four feet four inches tall.

(2) he was the world's oldest living man.

(3) he belonged to Columbia.

(4) he had an alligator - hide complexion.

---

100. George Washington's name was mentioned to him.

(1) to teach him a bit of history

(2) to know whether he had any personal contacts with Washington

(3) to make fun of his advanced age

(4) to determine his age

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**P.T.O.**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**101.** वातावरणातील हरीतगृह वायुंचे प्रमाण स्थिर करण्याचे उद्दिष्ट कोणत्या कराराचे आहे ?

(1) यू.एन.एफ.सी.सी.सी (2) सी.आई.टी.ई.एस.

(3) सी.बी.डी (4) यापैकी नाही

Which covention has the objective to stabilize the green house gases in the atmosphere ?

(1) UNFCCC (2) CITES

(3) CBD (4) None of these

---

**102.** वनस्पती त्यांच्या वाढीस दिवस व रात्रीच्या काळाला प्रतिसाद देत असतात त्यास काय म्हणतात ?

(1) प्रकाशावधिप्रभाव (2) प्रकाशिय-श्वसन

(3) बाष्पोत्सर्जन (4) पानाद्वारे बाष्पोत्सर्जन

Response of the plants to the relative length of day and night is called as :

(1) Photoperiodism (2) Photo-respiration

(3) Evapotranspiration (4) Transpiration through leaves.

---

**103.** कोणते वर्ष ''आंतरराष्ट्रीय वन वर्ष'' म्हणून साजरे केले गेले ?

(1) 2005 (2) 2009 (3) 2010 (4) 2011

"International Year of Forest" was celebrated in the year :

(1) 2005 (2) 2009 (3) 2010 (4) 2011

---

**104.** 'सर्व शिक्षा अभियान' ही योजना ________ रोजी कॅबीनेटच्या बैठकीत मंजूर करण्यात आली.

(1) 10 आक्टोबर 1998 (2) 16 नोव्हेंबर 2000

(3) 20 डिसेंबर 2002 (4) 26 जानेवारी 2003

The scheme of Sarva Shiksha Abhiyan was approved by the cabinet in it's meeting held on ________.

(1) $10^{th}$ Oct. 1998 (2) $16^{th}$ Nov. 2000

(3) $20^{th}$ Dec. 2002 (4) $26^{th}$ January 2003

---

**105.** महाराष्ट्रात कोणत्या फळपिकाची सर्वात जास्त लागवड आहे ?

(1) केळी (2) द्राक्षे (3) संत्री (4) आंबा

Which fruit crop has the highest area under cultivation in Maharashtra ?

(1) Banana (2) Grapes (3) Orange (4) Mango

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.StudentBounty.com

StudentBounty.com



**106.** 2011 सालच्या भारत वन स्थिती अहवालानुसार भारतातील वन आणि वृक्षाच्छादित क्षेत्र किती होते ?

(1) 75.20 दशलक्ष हेक्टर (2) 78.00 दशलक्ष हेक्टर

(3) 78.50 दशलक्ष हेक्टर (4) 78.29 दशलक्ष हेक्टर

What is the forest and tree cover of India as per the India State of Forests Report 2011 ?

(1) 75.20 m ha (2) 78.00 m ha

(3) 78.50 m ha (4) 78.29 m ha

---

**107.** जोड्या जुळवा :

| | व्यक्ती | | कार्य |
|---|---|---|---|
| (a) | वेंकटरामन रेड्डी | (i) | रंगभूमी अभिनेता |
| (b) | प्रताप रेड्डी | (ii) | रंगभूमी दिग्दर्शक |
| (c) | अब्राहम अल्काझी | (iii) | अपोलो इस्पितळ समूह |
| (d) | झोहरा सेहगल | (iv) | रसायनशास्त्रातील नोबेल विजेते |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

Match the following :

| | Person | | Area of Work |
|---|---|---|---|
| (a) | Venkatraman Reddy | (i) | Theatre Actor |
| (b) | Pratap Reddy | (ii) | Theatre Director |
| (c) | Ebrahim Alkazi | (iii) | Apollo Hospital Group |
| (d) | Zohra Sehegal | (iv) | Nobel Laureate in Chemistry |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**108.** लोकसभेत लोकपाल बिल ________ रोजी मंजूर करण्यात आले.

(1) 25 मार्च 2012 (2) 26 जानेवारी 2012

(3) 27 डिसेंबर 2011 (4) 15 ऑगस्ट 2011

Lokpal bill was passed in Loksabha on ________.

(1) 25 March 2012 (2) 26 January 2012

(3) 27 December 2011 (4) 15 August 2011

---

**109.** चित्रपट अभिनेत्री वहिदा रहमान यांना 2011 च्या ________ ने सन्मानीत करण्यात आले.

(1) पद्मभूषण (2) पद्मविभूषण

(3) पद्मश्री (4) भारतरत्न

Film star Waheeda Rehman was awarded with ________ for 2011.

(1) Padma Bhushan (2) Padma Vibhushan

(3) Padma Shri (4) Bharat Ratna

---

**110.** भारतातीय नागरी सेवेतील (आय.सी.एस.) वयोमर्यादा 21 वरुन 19 वर्षे कोणी केली ?

(1) लॉर्ड कर्झन (2) लॉर्ड रिपन (3) लॉर्ड लिटन (4) लॉर्ड मेयो

Who lowered the age limit for Indian Civil Services (ICS) from 21 to 19 years ?

(1) Lord Curzon (2) Lord Ripon (3) Lord Lytton (4) Lord Mayo

---

**111.** सरकारच्या उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असलेले अंदाजपत्रक कोणते ?

(1) संतुलित अंदाजपत्रक (2) शिलकी अंदाजपत्रक

(3) तुटीचे अंदाजपत्रक (4) यापैकी नाही

What the Government Budget exhibiting more expenditure than the income is called ?

(1) Balance Budget (2) Surplus Budget

(3) Deficit Budget (4) None of the above

---

**112.** 99 वी इंडियन सायन्स कॉंग्रेस परिषद कोठे झाली ?

(1) कोलकत्ता (2) चेन्नई (3) भुवनेश्वर (4) मुंबई

Where was the 99th 'Indian Science Congress' conference held ?

(1) Kolkatta (2) Chennai (3) Bhuwaneshwar (4) Mumbai

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**113.** खालीलपैकी कोणत्या कारणामुळे कापूस लाल पडतो ?

(1) ओलाव्याचा ताण (2) नत्र आणि मॅग्नेशियमची कमतरता

(3) रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव (4) वरील सर्व

What turns cotton red ?

(1) Moisture stress (2) Deficiency of nitrogen and Magnesium

(3) Attack of sucking pests (4) All the above

---

**114.** जैतापूर येथे कोणत्या प्रकारच्या ऊर्जाप्रकल्पाची उभारणी होणार आहे ?

(1) औष्णिक ऊर्जा (2) जलविद्युत (3) अणु ऊर्जा (4) सौर ऊर्जा

What kind of power plant is to be estabilished at Jaitapur ?

(1) Thermal Power (2) Hydro Power (3) Nuclear Power (4) Solar Power

---

**115.** भारतात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना कोणत्या वर्षी करण्यात आली ?

(1) 1 एप्रिल 1935 (2) 1 एप्रिल 1948 (3) 1 एप्रिल 1936 (4) 1 एप्रिल 1940

When was the Reserve Bank of India established ?

(1) $1^{st}$ April 1935 (2) $1^{st}$ April 1948 (3) $1^{st}$ April 1936 (4) $1^{st}$ April 1940

---

**116.** भारतात राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करण्याचे कार्य कोणत्या संघटनेकडे सोपविले आहे ?

(1) केंद्रीय सांख्यिकीय संघटना (2) राज्य सांख्यिकीय संघटना

(3) स्थानिक सांख्यिकीय संघटना (4) यापैकी नाही

Which organization computes National Income in India ?

(1) Central Statistical Organization (2) State Statistical Organization

(3) Local Statistical Organization (4) None of the above

---

**117.** डी.डी.टी. हे कोणत्या प्रकारचे प्रदूषक आहे ?

(1) प्राथमिक (2) द्वितीय

(3) तृतीय (4) यापैकी कोणतेही नाही

What type of pollutant is DDT ?

(1) Primary (2) Secondary

(3) Tertiary (4) None of these

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**P.T.O.**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**118.** महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचे कार्यक्षेत्र कोणते ?

(1) महाराष्ट्र (2) महाराष्ट्र व गोवा

(3) महाराष्ट्र, गोवा, दमण व दीव (4) संपूर्ण भारत

What is the area of operations of the Maharashtra State Finance Corporation ?

(1) Maharasthra (2) Maharasthra and Goa

(3) Maharasthra, Goa, Daman and Diu (4) Entire India

---

**119.** राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा भारतात केव्हा लागू झाला ?

(1) 1 जानेवारी 2005 (2) 2 फेब्रुवारी 2006

(3) 1 एप्रिल 2007 (4) 2 ऑक्टोबर 2008

When did the National Rural Employment Guarantee Act come into force ?

(1) 1 st January 2005 (2) 2 nd February 2006

(3) 1 st April 2007 (4) 2 nd October 2008

---

**120.** ________ कलमात आसाम, नागालँड आणि मणिपूर ह्या राज्यांसाठी विशेष तरतूद करण्यात आलेली आहे.

(1) 321 (2) 331 (3) 371 (4) 381

Article ________ contains special provision in respect of the states of Assam, Nagaland and Manipur.

(1) 321 (2) 331 (3) 371 (4) 381

---

**121.** तांबड्या जमिनी कोणत्या प्रकारच्या खडकापासून निर्माण (तयार) होतात ?

(1) बेसाल्ट खडक (2) ग्रेनाईट खडक (3) डोलोमाईट खडक (4) लिग्नाईट खडक

From which type of rock Red Soils are formed ?

(1) Basalt rock (2) Granite rock (3) Dolomite rock (4) Lignite rock

---

**122.** 'आधार' योजनेचा शुभारंभ महाराष्ट्रातील कोणत्या ठिकाणी करण्यात आला ?

(1) चंद्रपूर (2) टेंभली (3) गडचिरोली (4) नंदुरबार

Where in the state of Maharashtra 'Adhar' scheme was launched ?

(1) Chandrapur (2) Tembhali (3) Gadchiroli (4) Nandurbar

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.StudentBounty.com

StudentBounty.com



123. उत्तरेकडून दक्षिणस्थित समुद्री किल्यांचा क्रम लावा–

(1) विजयदुर्ग – सिंधुदुर्ग – खांदेरी – उंदेरी

(2) खांदेरी – सिंधुदुर्ग – उंदेरी – विजयदुर्ग

(3) सिंधुदुर्ग – विजयदुर्ग – खांदेरी – उंदेरी

(4) उंदेरी – खांदेरी – विजयदुर्ग – सिंधुदुर्ग

Arrange the following sea Forts as they appear from north to south .

(1) Vijaydurga - Sindhudurga - Khanderi - Underi

(2) Khanderi - Sindhudurga - Underi - Vijaydurga

(3) Sindhudurga - Vijaydurga - Khanderi - Underi

(4) Underi - Khanderi - Vijaydurga - Sindhudurga

---

124. "सत्वबोधिनी सभेची" स्थापना कोणी केली होती ?

(1) देवेन्द्रनाथ टागोर (2) रविन्द्रनाथ टागोर

(3) ईश्वरचंद्र विद्यासागर (4) राजा राममोहन रॉय

Who established "Satvbodhini Sabha" ?

(1) Devendranath Tagor (2) Ravindranath Tagor

(3) Ishwarchandra Vidhyasagar (4) Raja Rammohan Roy

---

125. स्वामी दयानंद सरस्वतींनी लिहिलेल्या पुस्तकाचे नाव काय होते ?

(1) सार्वजनिक सत्यधर्म (2) सत्यार्थ प्रकाश

(3) ग्रामगीता (4) जोसेफ मॅझिनीचे चरित्र

What was the name of the book written by Swami Dayanand Saraswati ?

(1) Sarvajanik Satyadharma (2) Satyarth Prakash

(3) Gramgeeta (4) Biography of Joseph Mazzini

---

126. 'खल्लास : ॲन ए टू झेड गाईड टू अंडरवर्ल्ड' या पुस्तकाचे लेखक कोण ?

(1) अल्बर्ट होरो (2) ज्योतिंद्र डे

(3) शोभा डे (4) नोअम चॉम्स्की

The book 'Khallas : An A to Z Guide to underworld' is written by :

(1) Albert Horo (2) Jyotendra Dey

(3) Shobha Dey (4) Noam Chomski

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**127.** भारताच्या परराष्ट्र धोरणात 'पंचशील तत्वे' कोणी मांडली होती ?

(1) पंडित नेहरु (2) इंदिरा गांधी

(3) सरदार वल्लभभाई पटेल (4) लॉर्ड माऊंट बॅटन

Who propogated the idea of "Panchashila" in Indian Foreign Policy ?

(1) Pandit Nehru (2) Indira Gandhi

(3) Sardar Vallabhbhai Patel (4) Lord Mountbatten

---

**128.** (A) शेती, घरे, कालवा किंवा इतर क्षेत्राचे वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी लागवड केलेली झाडे म्हणजे 'विंडब्रेक'.

(B) सामाजिक वनीकरणात साधारणपणे वनेतर क्षेत्रांत वृक्ष लावण्यात येतात.

वरीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(1) केवळ (A) बरोबर (2) केवळ (B) बरोबर

(3) (A) व (B) दोन्ही बरोबर (4) (A) व (B) दोन्ही चूक

(A) Trees planted in order to protect fields, canals or other areas from blowing wind for windbreak.

(B) In Social Forestry normally trees are planted on non forest lands.

Which of the above statements is/are **correct** ?

(1) Only (A) is correct (2) Only (B) is correct

(3) Both (A) and (B) are correct (4) Neither (A) nor (B) is correct

---

**129.** 2011 मध्ये भारतात पुरुष साक्षरतेचे प्रमाण किती होते ?

(1) 81.13% (2) 82.14% (3) 85.13% (4) 86.14%

What was the percentage of male literacy in India in 2011 ?

(1) 81.13% (2) 82.14% (3) 85.13% (4) 86.14%

---

**130.** 59 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारात सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार कोणाला मिळाला ?

(1) गिरीश कुलकर्णी (2) उपेंद्र लिमये

(3) उमेश कुलकर्णी (4) सुबोध भावे

Who bagged the best Actor Award in the 59th National Cine-Awards ?

(1) Girish Kulkarni (2) Upendra Limaye

(3) Umesh Kulkarni (4) Subhodh Bhave

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

131. 'डेंड्रोलॉजी' हे पुस्तक कोणी लिहीले आहे ?

(1) हारलॉव आणि हरार (2) कार्ल लीनायस्
(3) ए.पी.डी. कॅन्डोली (4) स्कुटमन आरजन

The book 'Dendrology' was wirtten by :

(1) Harlow and Harrar (2) Carl Linnaeus
(3) A.P. de Candolle (4) Schuitman Arjun

---

132. ________ नदी सुधागड जवळ उगम पावून अलिबागच्या दक्षिणेस खाडीस मिळते.

(1) पाताळगंगा (2) कुंडलिका (3) सावित्री (4) उल्हास

River ________ originates near Sudhagad and merges in the creek south of Alibag.

(1) Patalganga (2) Kundalika (3) Savitri (4) Ulhas

---

133. भारतात कृषी माल किंमत आयोगाची स्थापना केव्हा झाली ?

(1) 1960 (2) 1965 (3) 1967 (4) 1969

When was the Agricultural Prices Commission set up in India ?

(1) 1960 (2) 1965 (3) 1967 (4) 1969

---

134. भारतामध्ये 20000 चौ.कि.मी. पेक्षाही जास्त जलाशय क्षेत्र असलेल्या खोऱ्यांची संख्या किती आहे ?

(1) 12 (2) 15 (3) 18 (4) 21

How many river basins are there in India having more than 20000 Sq. km. drainage area each ?

(1) 12 (2) 15 (3) 18 (4) 21

---

135. सोयाबीन बियामध्ये प्रथिनांचे प्रमाण किती टक्के आहे ?

(1) 20% (2) 30% (3) 40% (4) 50%

How much is the protein content of Soybean seed ?

(1) 20% (2) 30% (3) 40% (4) 50%

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



136. खालीलपैकी कोणत्या क्षेत्रातून 'ग्रीन हाऊस' वायू जास्त प्रमाणात बाहेर पडतो ?

(1) औद्योगिक (2) कृषि (3) ऊर्जा (4) वाहतूक

Which sector emits more green house gases ?

(1) Industrial (2) Agricultural (3) Energy (4) Transport

---

137. सहारा वाळवंट कोणत्या खंडात आहे ?

(1) उत्तर आफ्रिका (2) दक्षिण आफ्रिका (3) न्युझीलंड (4) आशिया

In which continent is Sahara desert located ?

(1) North Africa (2) South Africa (3) New Zealand (4) Asia

---

138. कायद्यासमोर सर्वांना समानतेने वागविले जाईल असे घटनेच्या कोणत्या कलमात म्हटले आहे ?

(1) 14 (2) 19 (3) 29 (4) 32

As per which article of the Constitution all are equal before the law ?

(1) 14 (2) 19 (3) 29 (4) 32

---

139. कोणत्या घटना दुरुस्तीद्वारे बोडो, डोंगरी, मैथिली आणि संथाली ह्या भाषांचा आठव्या परिशिष्टांत समावेश करण्यात आला ?

(1) 91 (2) 92 (3) 93 (4) 94

By which amendment Bodo, Dogri, Maithili and Santhali languages were included in the eighth schedule ?

(1) 91st (2) 92nd (3) 93rd (4) 94th

---

140. कानपूर येथील 1857 च्या उठावाचे नेतृत्व कोणी केले होते ?

(1) राणी लक्ष्मीबाई (2) राजा कुंवरसिंह

(3) नानासाहेब (4) मंगल पांडे

Who led the revolt of 1857 at Kanpur ?

(1) Rani Laxmibai (2) Raja Kunwarsinh

(3) Nana Saheb (4) Mangal Pandey

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

141. ब्राझीलच्या पहिल्या महिला अध्यक्षा कोण ?

(1) तनविर शेख (2) दिलमा रूसेफ

(3) हजिमा खान (4) शेख हसिना

Who is the first female President of Brazil ?

(1) Tanweer Shaikh (2) Dilma Rousseff

(3) Hajima Khan (4) Shaikh Hasina

---

142. महाराष्ट्रात रबी हंगामात मोठ्या प्रमाणात जमीनीत साठविलेल्या ओलाव्यावर कोणते तेलबियापिक घेतले जाते ?

(1) भुईमूग (2) मोहरी (3) करडई (4) सोयाबीन

Which oilseed crop thriving on residual soil moisture is largely taken in Maharashtra during rabi season ?

(1) Groundnut (2) Mustard (3) Safflower (4) Soybean

---

143. 42 वी जागतिक आर्थिक परिषद स्वित्झर्लंडमधील दावोस येथे केव्हा झाली ?

(1) 25 ते 29 डिसेंबर 2011 (2) 25 ते 29 जानेवारी 2012

(3) 25 ते 29 फेब्रुवारी 2012 (4) 25 ते 29 मार्च 2012

When was the 42nd World Economic Summit held at Davos in Switzerland ?

(1) 25th to 29th December 2011 (2) 25th to 29th January 2012

(3) 25th to 29th February 2012 (4) 25th to 29th March 2012

---

144. 2011 च्या जनगणना अहवालानुसार महाराष्ट्रात साक्षरतेचे प्रमाण किती आहे ?

(1) 76.9% (2) 78.9% (3) 82.9% (4) 84.9%

What is the literacy rate in Maharashtra according to census report of 2011 ?

(1) 76.9% (2) 78.9% (3) 82.9% (4) 84.9%

---

145. एक नोव्हेंबर 2011 रोजी भारतीय सेनेने अभिनव बिंद्रा आणि महेंद्रसिंग धोनी यांना ________ म्हणून सन्मानीत केले.

(1) मेजर (2) लेफ्टनंट कर्नल

(3) कर्नल (4) सुभेदार

On 1st Nov. 2011 Abhinav Bindra and Mahendrasing Dhoni were honoured as ________ by Indian Army.

(1) Major (2) Lieutenant Colonel

(3) Colonel (4) Subhedar

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

146. पुढीलपैकी कोणती कलमे राष्ट्रपती आणि मंत्रीपरीषद यांच्यातील संबंधांबाबत आहेत ?

(1) कलम 71, 75 आणि 78 (2) कलम 72, 75 आणि 78

(3) कलम 74, 75 आणि 78 (4) कलम 73, 75 आणि 78

Which articles deal with the relationship of the president and the council of Ministers ?

(1) Art. 71, 75 and 78 (2) Art. 72, 75 and 78

(3) Art. 74, 75 and 78 (4) Art. 73, 75 and 78

147. (A) हॉकीचा समावेश ऑलिंपिक खेळात 1908 पासून करण्यात आला.

(B) भारतीय हॉकी संघाने ऑलिंपिक स्पर्धा 7 वेळा जिंकली.

वरीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(1) फक्त (A) (2) फक्त (B)

(3) (A) आणि (B) दोन्हीही (4) (A) नाही आणि (B) देखील नाही

(A) Hockey was included in the Olympic games for the first time in 1908.

(B) India has won the Olympic hockey title 7 times.

Which of the above statements is/are **correct** ?

(1) Only (A) (2) Only (B)

(3) Both (A) and (B) (4) Neither (A) nor (B)

148. ईशान्य मान्सून वारे सर्व सामान्यपणे हिवाळी मान्सून वारे म्हणून ओळखले जातात व ते __________ कडून __________ कडे वाहतात.

(1) जमिनीकडून समुद्राकडे (2) समुद्राकडून जमिनीकडे

(3) जमिनीकडून जमिनीकडे (4) समुद्राकडून समुद्राकडे

The north east monsoons commonly known as winter monsoons blow from _________ to _________.

(1) Land to Sea (2) Sea to Land

(3) Land to Land (4) Sea to Sea

149. घटनेतील कोणत्या कलमाद्वारे 'महानगरपालिकेची' व्याख्या केली आहे ?

(1) कलम 243 पी (2) कलम 243 क्यू (3) कलम 243 टी (4) कलम 343 यू

Which Constitutional article defines 'Municipalities' ?

(1) Article 243 P (2) Article 243 Q (3) Article 243 T (4) Article 343 U

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.StudentBounty.com

150. कोणता दिवस 'जागतिक अभियंता दिन' म्हणून साजरा केला जातो ?

(1) 15 नोव्हेंबर (2) 16 ऑक्टोबर

(3) 15 सप्टेंबर (4) 16 डिसेंबर

Which day is celebrated as the 'International Engineers Day' ?

(1) $15^{th}$ November (2) $16^{th}$ October

(3) $15^{th}$ September (4) $16^{th}$ December

---

-oOo-

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



StudentBounty.com
www.StudentBounty.com

StudentBounty.com

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.StudentBounty.com

StudentBounty.com

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



www.StudentBounty.com

StudentBounty.com



## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

Q. No. 201. सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती  (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय  (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्र.क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करुन दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करुन दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरु नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

SEAL

www.StudentBounty.com